

दापोली पंचायत समितीच्या सभापतीपदी उन्मेष राजे; उपसभापतीपदी नम्रता तोडणकर यांची निवड

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

भैरीबुवा व देवी जोगेश्वरीच्या शिमगोत्सवाची रंगपंचमीला जल्लोषात सांगता!

पान ८



रत्नागिरी ● मंगळवार १० मार्च, २०२६ | RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक १२० ● पाने ८ ● ₹ ५.०० | www.prahaar.in | epaper.prahaar.in

## वेचक

### आयएएस अधिकारी देवेंदर सिंह यांचे निलंबन मागे

**मुंबई :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान मंत्र्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याप्रकरणी आयएएस अधिकारी देवेंदर सिंह यांच्यावर थेट



निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी ब्रीफिंगसाठी वारंवार बोलावूनही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंह उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे ही कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यांनी याबाबतचे पुरावे सादर केल्यानंतर त्यांचे निलंबन मागे घेण्यात येत असल्याची

(पान २ वर)

# इस्त्रायलकडून लेबनॉनवर ‘व्हाईट फॉस्फरस’चा हल्ला

### आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संस्थेचा आरोप

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

पश्चिम आशियातील युद्ध अधिक तीव्र होत असताना ‘ह्यूमन राईट्स वॉच’ या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संस्थेने गंभीर आरोप केला आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, इस्रायलच्या सैन्याने लेबनॉनमधील दक्षिण भागातील निवासी परिसरात ‘व्हाईट फॉस्फरस’ शस्त्रांचा वापर केल्याची पडताळणी केली आहे. संस्थेच्या अहवालानुसार, ३ मार्च २०२६ रोजी दक्षिण लेबनॉनमधील योहमोर



या शहरातील घरांवर इस्रायली सैन्याने तोफखान्याद्वारे ‘एअरबर्स्ट व्हाईट फॉस्फरस’चा मारा केला. या हल्ल्यानंतर किमान दोन घरे आणि एका कारला आग लागल्याचेही समोर आले आहे.

‘ह्यूमन राईट्स वॉच’ने या घटनेशी संबंधित सात छायाचित्रांची पडताळणी करून त्यांचे भौगोलिक

(पान २ वर)

### हवेच्या खेळण्यांवर इराणची लष्करी रणनीती

इराण विरूद्ध अमेरिका -इस्त्रायल यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, इराणने ‘इन्फ्लेटेबल’ म्हणजेच हवेने भरलेले डमी टँक, विमाने आणि क्षेपणास्त्रे तैनात केल्याचे दावे सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. शत्रूची दिशाभूल करण्यासाठी इराण चक्क हवेने भरलेली खेळणी

(पान २ वर)

## इंधन तुटवड्याबाबतच्या अफवांवर विश्वास ठेवू नका- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)**

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार तेल आणि गॅसबाबत काळजी घेत आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थिती आपल्या सगळ्यांना माहिती आहे. पण तरीही कुठेही तुटवडा पडू नये, यासाठी सर्व प्रकारच्या उपाययोजना सुरु आहेत. कुणीही अफवा पसरवू नये आणि कुणीही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी केले.

विधानभवन परिसरात माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ‘अफवांवर विश्वास ठेवून इंधनाचा साठा केल्यास परिस्थिती खराब होईल. त्यातून मागणी आणि पुरवठा ही साखळी तुटेल. त्यामुळे कुठल्याही अफवेवर विश्वास ठेवू



नका, माध्यमांनी पुरावा नसलेल्या गोष्टी दाखवून लोकांमध्ये भीती तयार करू नये. केंद्र सरकार याबाबत उचित काळजी घेत आहे’, असेही ते म्हणाले.

काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ‘ज्यांचे आयुष्य एका परिवाराची गुलामी करण्यात गेले, त्यांना देश कसा चालवला जातो, देश कसा सार्वभौम ठेवायचा? याबाबत काहीही माहिती नाही. आज मोदी यांनी ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित केली आहे. अन्यथा, भारताची काय परिस्थिती असती, हे आपल्याला माहिती आहे. ज्यावेळी टॅरिफ वॉर झाला,

(पान २ वर)

### विरोधकांना तोंड दाखवायला जागा नाही

शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर केलेल्या आंदोलनावर भाष्य करताना फडणवीस म्हणाले, ‘आता विरोधकांना तोंड दाखवायला जागा उरलेली नाही. ‘गिरे तो भी टांग उपर’ असे विरोधकांचे सुरु आहे. जनता विरोधकांसोबत नाही.

(पान २ वर)

## आरटीई प्रवेशासाठीची १ किलोमीटर अंतराची जाचक अट अखेर रद्द

### ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

**मुंबई (प्रतिनिधी)**

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने आरटीई प्रवेशासाठी राज्य सरकारने घातलेली १ किलोमीटर अंतराची जाचक अट रद्द केली आहे. या निर्णयामुळे खासगी शाळांत प्रवेशासाठी १ किमीची मर्यादा नसेल, ज्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्य सरकारने आणलेल्या १ किलोमीटरच्या आत सरकारी/अनुदानित शाळा असल्यास, खासगी शाळेत आरटीई प्रवेश नाही, या नियमाला न्यायालयाने स्थगिती दिली आहे. आरटीई कायद्यात अशी कोणतीही अंतराची मर्यादा नाही. त्यामुळे हा निर्णय कायद्याच्या विरोधात आणि जनहिताच्या विरुद्ध असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. या नियमामुळे अनेक विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत होते, आता ही अट रद्द झाल्याने पूर्वीप्रमाणेच, म्हणजेच ६ किमी अंतरापर्यंतच्या शाळा निवडण्याचा पर्याय उपलब्ध राहू शकतो. बोधी रामटेके आणि दीपक चटप यांनी या निर्णयाला

(पान २ वर)

## दोन अर्ज बाद ठरल्याने राज्यसभा निवडणूक बिनविरोध

**मुंबई (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागांसाठी होणारी निवडणूक अपेक्षेप्रमाणे बिनविरोध झाली आहे. गुरुवारी दाखल झालेल्या ९ अर्जांपैकी दोन अपक्ष उमेदवारांचे अर्ज तांत्रिक कारणास्तव बाद ठरल्याने सात जागांसाठी ७ उमेदवार रिंगणात उरले. यामध्ये ज्येष्ठ नेते शरद पवार, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आणि भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासह सातही नेत्यांच्या बिनविरोध निवडीवर शिक्कामोर्तब झाले आहे.

या निवडणुकीत संख्याबळानुसार भाजपला ४, तर शिवसेना, राष्ट्रवादी आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांना प्रत्येकी एक जागा मिळाली



आहे. उमेश म्हात्रे आणि कांते सायन्ना या दोन अपक्ष उमेदवारांनीही आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, त्यांच्या अर्जावर सूचक आणि अनुमोदकांच्या सह्या नसल्याने छाननीमध्ये हे दोन्ही अर्ज बाद ठरवण्यात आले. त्यामुळे ही निवडणूक अपेक्षेप्रमाणे बिनविरोध झाली.

भाजपने यंदा राज्यसभेत राज्यातील महत्त्वाच्या समाजघटकांना प्रतिनिधीत्व दिले आहे. नागपूरच्या माजी महापौर राहिलेल्या माया इवनाते या भाजपचा राज्यातील महत्त्वाचा आदिवासी चेहरा आहेत.

(पान २ वर)

### आठवलेंची हॅट्ट्रीक

पक्षाच्या राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका निभावणारे विनोद तावडे यांना अपेक्षेप्रमाणे राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तर, मित्रपक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रमुख रामदास आठवले यांच्यावर भाजपने पुन्हा एकदा विश्वास दाखवला

(पान २ वर)

## लांजात मुलाकडून वृद्ध आईवर जीवघेणा हल्ला

### क्षुल्लक कारणातून वाद विकोपाला; गंभीर जखमी अवस्थेत जिल्हा रुग्णालयात दाखल

**लांजा (प्रतिनिधी)**

‘मसाला वाटून दे’ असे आईने सांगितल्याच्या रागातून वाद विकोपाला जाऊन सख्ख्या मुलाने आईच्या डोक्यात दगडी वरवंटा घालून तिला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना रविवारी सायंकाळी ७ वाजता लांजा धावणेवाडी येथे घडली आहे. या प्रकरणी लांजा पोलिसांनी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष गणपत दिवाळे (वय ३५, रा. धावणेवाडी, लांजा, ता.लांजा) हा रात्रीच्या जेवणासाठी कोळंबी घेऊन घरी आला होता. त्यानंतर त्याची आई सुनिता गणपत दिवाळे (वय ७०) यांनी कोळंबी साफ करून झाल्यानंतर ती बनवण्यासाठी संतोषला मसाला वाटून देण्यास सांगितले. यावरून आई-मुलामध्ये वाद निर्माण झाला. मात्र हा वाद विकोपाला जाऊन मुलगा संतोष दिवाळे याने संतापाच्या भरात आईच्या डोक्यात दगडी वरवंटा घातला. तसेच तिचा शर्टाने गळा

(पान २ वर)

## भोस्ते घाटात कंटेनर दीडशे फूट खोल दरीत कोसळला, चालक गंभीर जखमी

**खेड (प्रतिनिधी)**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भोस्ते घाटात सोमवारी दुपारच्या सुमारास भीषण अपघात घडला. गोव्याहून मुंबईच्या दिशेने जात असलेला एक कंटेनर अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने सुमारे दीडशे फूट खोल दरीत कोसळला. हा अपघात इतका भीषण होता की कंटेनरचे चेसिस रस्त्यालगतच अडकून राहिले, तर कंटेनरचा लोखंडी सांगाडा आणि मालासह मोठा भाग थेट खोल दरीत जाऊन



पडला.

अपघातानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. महामार्गावरून

(पान २ वर)

## सोशल मीडियावर महिलांविषयी आक्षेपार्ह टिप्पणी करणे भोवणार

### गृहमंत्रालयासोबत समन्वय साधून कठोर कारवाईचे मंत्री आदिती तटकरे यांचे संकेत

**मुंबई**

सोशल मीडियाच्या माध्यमातून सामान्य महिलांपासून ते महिला अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांनाच खालच्या पातळीवर जाऊन लक्ष्य केले जात आहे. अशा प्रवृत्तींमुळे महिलांच्या मनःस्वास्थ्यावर गंभीर परिणाम होत असून, हे प्रकार रोखण्यासाठी राज्य सरकार आता कठोर पावले उचलणार आहे. सायबर गुन्हेगारी आणि महिलांविरोधी टिप्पणी रोखण्यासाठी गृहविभागासोबत विशेष समन्वय साधला जाईल, अशी घोषणा महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सोमवारी विधानसभेत केली.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मांडलेल्या प्रस्तावावर झालेल्या चर्चेला तटकरे उत्तर देत होत्या. यावेळी त्यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि सुरक्षेसाठी विविध महत्त्वपूर्ण योजनांची घोषणा


(पान २ वर)

## दापोलीतील जंगलात दुर्मीळ ‘शेकरू’चे दर्शन

### व्हिडिओ समोर आल्यानंतर प्राणीप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण

**दापोली (विशेष प्रतिनिधी)**

तालुक्यातील जंगल परिसरात महाराष्ट्राचा राज्य प्राणी असलेल्या दुर्मीळ शेकरूचे दर्शन घडल्याने प्राणीप्रेमी आणि पर्यावरण प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दापोलीतील विद्यापीठ परिसरात असलेल्या वनविभागाच्या कार्यालयाजवळील झाडांवर मुक्तपणे वावरत असलेल्या



शेकरूचा व्हिडिओ सध्या समोर आला असून हा व्हिडिओ परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

समृद्ध आणि दाट जंगलांमध्ये आढळणारा शेकरू प्रामुख्याने महाबळेश्वर, कोयना आणि भीमाशंकर या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. मात्र आता कोकणातील दापोली परिसरातही त्याचे दर्शन झाल्याने येथील जंगलांची समृद्धता आणि जैवविविधता अधोरेखित होत असल्याचे वन्यजीव तज्ज्ञांचे मत आहे.

दापोलीतील विद्यापीठ परिसरात असलेल्या उंच झाडांवर मुक्तपणे फिरणारा शेकरू स्थानिक नागरिकांच्या नजरेस पडला. त्यानंतर त्याचा व्हिडिओही काढण्यात आला. हा व्हिडिओ समोर आल्यानंतर प्राणीप्रेमी आणि पर्यावरण प्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे.

शेकरू हा महाराष्ट्राचा राज्य प्राणी असून त्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न

(पान २ वर)

## राज्यात नवीन ऑटो रिक्षा परवान्यांना स्थगिती

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचा निर्णय

**मुंबई (प्रतिनिधी)**

वाढती वाहतूक कोंडी रोखणे व शहरी प्रदूषणाला आळा घालण्यासाठी ९ मार्चपासून राज्यभर नवीन ऑटो रिक्षांना परवाना देण्यास स्थगिती देण्यात येत आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. तथापि, राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन ऑटो रिक्षांना कोणत्या निकषांवर नवीन परवाने द्यावेत, या संदर्भात निर्णय घेतला जाईल, त्यानूसार पुढील निर्णय



घेतला जाणार आहे, अशी माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली.

याबाबत मंत्री सरनाईक म्हणाले की, महाराष्ट्रातील ५ लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या

(पान २ वर)

## पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठीचे आर्थिक विकास महामंडळ पुढील अधिवेशनाच्या आत स्थापन करु

### मंत्री ॲड. आशिष शेलार यांची माहिती

**मुंबई**

पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची कार्यवाही पुढील अधिवेशनाच्या आत करण्यात येईल, तसेच पत्रकारांच्या विविध विषयांवर पत्रकार संघटना, शासनातील विविध विभाग, संबंधित लोकप्रतिनिधी यांची एक व्यापक बैठक लवकरच घेण्यात येईल, अशी



ग्वाही मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज विधान परिषदेत दिली.

विधान परिषदेमध्ये आमदार श्रीकांत भारतीय यांनी आज लक्षवेधी सूचना उपस्थित करून पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले. या लक्षवेधी मध्ये त्यांनी पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेत्यांसाठी सरकारने जाहीर केलेले आर्थिक विकास महामंडळ स्थापन करणे, कोरोना नंतर वृत्तपत्र क्षेत्रात निर्माण झालेल्या अडचणी, त्यातून निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने असलेल्या त्यांचे योजनेचे प्रस्ताव रखडणे, वर्तमानपत्र खरेदी करणारे वाचकांना आयकरात सूट देणे, पत्रकारांच्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी महामंडळातर्फे मदतीची आवश्यकता, गृहनिर्माण योजनेअंतर्गत पत्रकारांना घरे देणे, जाहिरातीवरील जीएसटी रद्द करणे,

(पान २ वर)

## आंबेडखुर्द येथे बेकायदेशीरपणे वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी महिलेसह तिच्या पतीला ३ दिवसांची पोलीस कोठडी

**देवरूख (प्रतिनिधी)**

बांगलादेशातून बेकायदेशीररित्या भारतात प्रवेश केलेल्या एका महिलेला संगमेश्वर तालुक्यातील आंबेडखुर्द येथे आश्रय दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी त्या महिलेसह तिच्या पतीविरुद्ध संगमेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली होती. न्यायालयाने दोघांनाही तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

सिनेम युसूफ सय्यद उर्फ शांतना अहमद खान (मूळ रा. खिलगाव, जिल्हा गाजीपूर, ढाका, बांगलादेश) ही महिला २०१७ पासून भारतात अवैधरित्या वास्तव्य करत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. संगमेश्वर तालुक्यातील आंबेड खुर्द येथील मुस्लीम मोहल्ल्यात राहणारा युसूफ महंमद सय्यद याने ती परदेशी नागरिक असल्याची माहिती असतानाही तिच्याशी विवाह करून तिला भारतात राहण्यासाठी आश्रय

(पान २ वर)

## ओला, उबर, रॅपिडोचा बाईक टॅक्सी परवाना रद्द

### परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची विधानपरिषदेत घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)**

मुंबईसह परिसरात बेकायदेशीररित्या सुरु असलेल्या ई बाईक टॅक्सी सेवेला लगाम घालण्यासाठी राज्य सरकारने आता कठोर पावले उचलली आहेत. ओला, उबेर, रॅपिडो या कंपन्यांचे तात्पुरते बाईक टॅक्सी परवाने सोमवारपासून (दि. ९ मार्च) रद्द करण्यात आल्याची घोषणा

(पान २ वर)

## मेळघाटच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेऊ

### मंत्री उदय सामंत, प्रकाश आबिटकर यांचे आश्वासन

#### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दूरध्वनीवरून संवाद

**अमरावती**

मेळघाट संघर्ष यात्रेच्या निमित्ताने मेळघाटातील आरोग्य, पाणी पुरवठा आणि इतर समस्या प्रामुख्याने समोर आल्या आहे. शासन स्तरावरून या समस्या सोडवण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहे. या सर्व



उपाययोजना तातडीने अंमलात आणण्यात याव्यात, यासाठी येत्या आठवड्यात बैठक घेऊन मार्ग काढण्यात येईल, असे आश्वासन मंत्री उदय सामंत आणि प्रकाश

(पान २ वर)

## अनिल अंबानींवर फसवणुकीचा नवा गुन्हा दाखल

### सीबीआयची कारवाई

**मुंबई**

केंद्रीय तपास ब्युरो (सीबीआय) ने अनिल अंबानी आणि त्यांच्या कंपनी रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) च्या इतर संचालकांविरुद्ध फसवणुकीचा नवा गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) च्या तक्रारीवरून करण्यात आली असून २०१३ ते २०१७ या कालावधीत बँकेसोबत सुमारे १,०८५ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी

(पान २ वर)

## दुसऱ्या सिलिंडरच्या बुकींगसाठी २५ दिवसांचे अंतर बंधनकारक!

### ● युद्धामुळे एलपीजी गॅसचा प्रचंड तुटवडा ● हॉटेल, कंपन्यांसाठीच्या गॅसवर बंदी

**मुंबई (प्रतिनिधी)**

तेल विपणन कंपन्यांनी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या बुकिंग नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. नवीन नियमानुसार, आता दोन सिलिंडर बुक करण्यामध्ये किमान २५ दिवसांचे अंतर असणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे गॅसचा काळाबाजार रोखण्यास मदत होईल, असा दावा केला जात आहे.

युद्धामुळे एलपीजी गॅसचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. यामुळे हॉटेल, कंपन्यांसाठीच्या गॅसवर बंदी आणण्यात आली आहे.



**घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीत ६० रुपयांनी वाढ**

तसेच घरगुती गॅस सिलिंडरच्या किंमतीदेखील ६० रुपयांनी वाढल्या आहेत. त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहकांकडून साठा करण्याची किंवा हे सिलिंडर हॉटेल व्यावसायिकांना दिले जाण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. यामुळे अचानक कंपन्यांनी आधीचा १५ दिवसांचा वेटिंग पिरिएड आता थेट २५ दिवसांवर नेऊन ठेवला आहे.

७ मार्चपासून हे नवीन नियम लागू झाले आहेत. अनेकांकडे एकापेक्षा जास्त गॅस जोडणी आहेत. दोन सिलिंडर असलेल्यांकडे एक सिलिंडर रिकामा असतो. त्या ग्राहकांनी दुसरा सिलिंडर बुक करण्यासाठी प्रयत्न सुरु केले. तेव्हा १५ दिवसांचा मेसेज दाखविण्यात येत होता.

(पान २ वर)